# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र.:- आरक्षण /ओ-२२/31

दिनांक : 11/01/2019

प्रति,
मा.प्राचार्य,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालये.
(राज्यस्तरीय संस्था वगळून)

**विषय - शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता सर्व संलंग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करून घेणेबाबत विशेष शिबीरास मुदतवाढ देण्याबाबत..**

संदर्भः- १. शासन निर्णय क्रमांकः बीसीसी- २०१८/प्र.क्र.५८१ए/२०१८/१६-ब, दिनांक ०५/१२/२०१८ व दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीचे शुध्दीपत्रक.
२. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१६/प्र.क्र. २२८ A/१८/१६-ब, दि. ०७/०१/२०१९
३. शासन निर्णय क्रमांकः आढावा-१५१३/प्र.क्र.१२५/म.शि.५, दिनांक ०३/११/२०१८
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. आरक्षण/ओ-२२/१९, दिनांक ०८/०१/२०१९.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन परिपत्रक तसेच शासन निर्णयांस अनुसरून आपणास कळविण्यात येते की, महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या भरती प्रक्रियेसाठी बिंदूनामावली तपासणी व त्यामध्ये शासन आदेशानुसार आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० करिता पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हयांमधील सर्व संलंग्नित अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांच्या बिंदूनामावलीची **प्राथमिक तपासणी** करून देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आरक्षण कक्षाकडून दिनांक ०८/०१/२०१९ ते दिनांक १२/०१/२०१९ पर्यंत **विशेष शिबीराचे** आयोजन करण्यात आले होते.

परंतू, काही महाविद्यालयांच्या विनंतीवरुन सदर शिबीरास **दिनांक १४ जानेवारी, २०१९ पर्यंत** वाढीव मुदत देण्यात येत आहे.

तरी, सदर मुदतीमध्ये बिंदूनामावली तपासणी करुन घेणे बंधनकारक असून ज्या महाविद्यालयाने या शिबीराच्या कालावधीमध्ये बिंदूनामावली तपासून न घेतल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या महाविद्यालयाची राहील, याची नोंद घ्यावी.

कळावे,

**नोटः- सदर शिबीर शनिवार व रविवार (१३ व १४ जाने.,२०१९) या दिवशीसुध्दा सुरु ठेवण्यात आले आहे.**

आपला,

11/1/19

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

E:\2019\Camp 2019\Letters.docx